मंत्रालयीन सेवा
महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग,**
**बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,**
**फोर्ट, मुंबई- ४००००१.**

दूरध्वनी क्र.०२२-२२०१ ६७९५ E-Mail- est१४-rdd@mah.gov.in

---

क्रमांक. जिपब-११२५/प्र.क्र.१४/आस्था-१४ दिनांक:- ५ मार्च,२०२५

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व),

२) मे.विन्सीस आय.टी.सर्व्हिसेस प्रा.लि, पुणे.

**विषय** :- सन २०२५ च्या जिल्हांतर्गत बदल्यासाठी अवघड क्षेत्र घोषित करणेबाबत.

**संदर्भ**: - मे.विन्सीस आय.टी.सर्व्हिसेस प्रा.लि, पुणे यांचे दि.३.३.२०२५ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपणांस कळविण्यात येत आहे :-

१) दि.१८.६.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अवघड क्षेत्रातील शाळांची यादी दर ३ वर्षांनी मार्च महिन्यात पुनर्विलोकन करुन सुधारित करण्याची तरतुद आहे. यापूर्वीची अवघड क्षेत्राची यादी सन २०२२ मध्ये सुधारित करण्यात आली असल्यामुळे सन २०२५ च्या जिल्हांतर्गत बदली प्रक्रियेकरीता सद्य:स्थितीत सन २०२५ स्थित अवघड क्षेत्राची सुधारित यादी प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

२) त्यानुसार सन २०२५ स्थित अवघड क्षेत्राची सुधारित यादी १५ मार्चपर्यंत घोषित करण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदांनी कार्यवाही करावी. या कालावधीत अवघड क्षेत्राची सुधारित यादी घोषित न केल्यास सन २०२२ ची अवघड क्षेत्राची यादी ग्राह्य धरण्यात येईल. तथापि, याबाबत काही प्रश्न उपस्थित झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेची राहील.

तसेच अवघड क्षेत्राची यादी सुधारित करताना संवादछायेचा प्रदेश (Communication Shadow Area) हा केवळ महाप्रबंधक, बीएसएनएल यांच्या अहवालानुसार ग्राह्य न धरता अशा ठिकाणी अन्य कंपन्यांचे Network उपलब्ध आहे का, हे देखील तपासावे. (उदा- Jio, Airtel, Vodafone-Idea)

३) सन २०२५ स्थित अवघड क्षेत्राची सुधारित यादी १५ मार्चपर्यंत घोषित झाल्यानंतर याबाबतची माहिती ऑनलाईन पोर्टलवर भरण्याकरीता ८ दिवसांची मुदतवाढ देण्यात येत आहे.

आपली,

(ज्योत्स्ना अर्जुन)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन